महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल. popat.galgate@gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७८

क्रमांक:-संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२२५/२१/विशि-१ दिनांक:-२६ ऑक्टोबर, २०२१

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

विषय:- विद्याशाखा अधिष्ठाता पदाच्या वेतननिश्चितीबाबत.
संदर्भ :-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे पत्र क्र.VC/ECD/२०२१-२२/५३९,
दि.१४ सप्टेंबर, २०२१

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी विद्याशाखा अधिष्ठाता पदास सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय निर्गमित न झाल्यामुळे सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांचे कार्यालयाकडून सदर पदांची वेतननिश्चिती केली जात नाही. त्यामुळे शासन स्तरावरून आदेश निर्गमित होण्याची विनंती केली. त्यानुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

विद्याशाखा अधिष्ठाताची पदे प्राध्यापक किंवा प्राचार्य पदाशी समकक्ष असल्याने प्राध्यापक व प्राचार्य पदास सहाव्या वेतन आयोगात अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी विद्याशाखा अधिष्ठाता पदास अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. त्यामुळे सातव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णय दि.०८.०३.२०१९ मधील समकक्ष वेतनश्रेणी रू.१,४४,२००-२,१८,२००/- (स्तर-१४) अनुज्ञेय करून त्याप्रमाणे विद्याशाखा अधिष्ठाता पदाची वेतननिश्चिती करण्यात यावी.

२. सदरचे पत्र वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२६६/२०२१/सेवा-९, दि.०४.१०.२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(धीरज अभंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- उचित कार्यवाहीसाठी,
१. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण,
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
३. निवड नस्ती (विशि-१)